लोकमत

## विजयकुमार देशमुख : कामगार मंडळाच्या स्पर्धा परीक्षा पूर्वतयारी प्रशिक्षणाचे उद्घाटन

# कामगारांच्या मुलांनी स्पर्धा परीक्षेद्वारे अधिकारी व्हावे

लोकमत न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** स्पर्धा परीक्षा पूर्वतयारी प्रशिक्षणासाठी ३०० कामगारांच्या पाल्यांनी नोंद केलेली संख्या ही कमी असून, जास्तीत जास्त कामगारांच्या पाल्यांनी हे प्रशिक्षण घेऊन अधिकारी बनण्याचा प्रयत्न केला पाहिजे, असे प्रतिपादन पालकमंत्री विजयकुमार देशमुख यांनी शुक्रवारी सकाळी केले.

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या वतीने हुतात्मा स्मृती मंदिरात स्पर्धा परीक्षा पूर्वतयारी प्रशिक्षण योजनेचे उद्घाटन देशमुख यांच्या हस्ते झाले, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी लक्ष्मी हायड्रोलिक्सचे संचालक शरदकृष्ण ठाकरे, व्याख्याते जयंत करंदीकर, सुनील पाटील, लक्ष्मीकांत गड्डम व्यासपीठावर उपस्थित होते.



कामगार कल्याण केंद्रातर्फे हुतात्मा स्मृती मंदिरात स्पर्धापूर्व परीक्षा प्रशिक्षणाचे उद्घाटन करताना पालकमंत्री विजयकुमार देशमुख, शरदकृष्ण ठाकरे, जयंत करंदीकर, सुनील पाटील, घन:शाम कुळमेथे आदी.

देशमुख पुढे म्हणाले, कामगार कल्याण मंडळाला निधीची कमतरता भासल्यास त्यांनी सांगावे, मुख्यमंत्री फडणवीस यांच्याशी चर्चा करून निधी वाढवून देण्याबाबत प्रयत्न करू. कामगारांच्या पाल्यांना स्पर्धा परीक्षेमध्ये सहभाग घेऊन प्रशासकीय सेवेची संधी मिळणार आहे. त्याकरिता जास्तीत जास्त कामगारांच्या पाल्यांनी या संधीचा लाभ घ्यावा.

### विजयी संघ

- समरगीत संघ प्रथम - गट कार्यालय अमरावती, द्वितीय - गट कार्यालय, सोलापूर, तृतीय - गट कार्यालय अकोला, उत्तेजनार्थ - गट कार्यालय अंधेरी व गट कार्यालय - नागपूर १ यांना पाहुण्यांच्या हस्ते पारितोषिक, चषक व प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

सुनील पाटील यांनी स्पर्धा परीक्षेसाठी विद्यार्थ्यांनी कशा प्रकारची तयारी करावी याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. त्यानंतर डॉ. जयंत करंदीकर यांनी आपल्या मनोगतात शासनाने महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या माध्यमातून कामगार व कामगार कुटुंबीयाकरिता स्पर्धा परीक्षा पूर्वतयारी प्रशिक्षण वर्गाचे आयोजन केले असून सकारात्मक दृष्टिकोन ठेवून सहभाग नोंदवावा, असे मत व्यक्त केले.

मंडळाच्या वतीने गुरुवारी राज्यस्तरीय समरगीत/स्फूर्तीगीत स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत राज्यातील वेगवेगळ्या भागातील २३० कलावंतांनी सहभाग घेतला होता. त्यांना बक्षिसांचे वितरणही यावेळी पालकमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले.

सूत्रसंचालन ज्योती वाघमारे यांनी केले. आभार सहायक कामगार कल्याण आयुक्त घन:शाम कुळमेथे यांनी मानले. कार्यक्रमास कामगार, पाल्य यांच्यासह इतर क्षेत्रातील मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होती. स्पर्धेचे परीक्षण दीपक कलढोणे, संतोष कोथळीकर, स्मिता देशपांडे यांनी केले.